# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**

प्रेस नोट क्र-५६ दिनांक - २३/०२/२०२४

**नालासोपारा पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्र. I १९०/२०१८ भा.दं.वि.सं. कलम ३७६(आय)(जे)(के) सह बालकांचे लैंगिक अत्याचारापासुन संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ४,६ प्रमाणे या गुन्हयातील आरोपीस २० वर्षे सक्त मजूरीची शिक्षा सुनाविल्याबाबत.**

-----ooo----

नालासोपारा पोलीस ठाणे गुन्हा रजि. क्र. I १९०/२०१८ भा.दं.वि.सं. कलम ३७६(२) (जे)(के), ३७६(३) सह लहान मुलांचे लैंगिक अत्याचारापासुन संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ४,६ प्रमाणे हा गुन्हयातील फिर्यादी व आरोपीत नामे जर्नादन कोंडीराम मकापल्ल्ी रा. रावर निर्मळ, मुळ रा. चिखली ता. अहमदपुर जि.लातुर हे एकमेंकांच्या ओळखीचे आहेत. दि. १३/०५/२०१८ रोजी १९:०० वा. सु. आरोपीत याने फिर्यादी यांच्या घरी येऊन फिर्यादी व त्यांची पत्नीचे सम्मतीने त्यांचा मुलगा वय ०३ वर्षे, मुलगी वय ०६ वर्षे, यांना त्याचे राहते घरी रावर येथे घेऊन गेला. फिर्यादीच्या मुलास खेळण्यासाठी बाहेर पाठवुन घरातील टि.व्ही. चा आवाज जोरात करुन फिर्यादीच्या अल्पवयीन मुलीस मांडीवर बसवून तिच्यावर लैगिंक अत्याचार केले व त्यानंतर मुलांना फिर्यादीच्या घराजवळील रोडवर सोडून निघून गेला म्हणुन दि १८/०५/२०१८ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयाचा तपास नालासोपारा पोलीस ठाणेचे नेमणुकीतील तत्कालीन पोलीस उप निरीक्षक- जगदिश नाईक यांचेकडे देण्यात आला होता.

प्रस्तुत गुन्हयाचे तपासी अधिकारी पोलीस उप निरीक्षक- जगदिश नाईक यांनी मा.वरीष्ठांच्या मार्गदर्शनाखाली सदर गुन्हयाचा श्रृंखला बद्ध तपास करुन आरोपीत याचेविरुद्ध दोषारोपपत्र दाखल केले. सदरच्या केस मध्ये मा. न्यायाधीश श्री.एस.व्ही. खोंगल सो, विशेष न्यायालयात, वसई, यांनी दि.३०/१२/२०२३ रोजी गुन्हयाचे सुनावणीमध्ये नमुद गुन्हयातील अटक आरोपीत नामे जनार्दन कोंडीराम मकापल्ली यास दोषी धरुन २० वर्षे सश्रम कारावास व ५,०००/- रुपये दंड व दंड न भरल्यास ०१ महिना साधी कैद अशी शिक्षा सुनावली आहे.

नमुद गुन्हयाचे तपासी अधिकारी पोउपनि/जगदिश नाईक-(सेवानिवृत्त), यांनी नमुद गुन्हयाचा तपास अतिशय उत्कृष्ट केल्याने आरोपीस शिक्षा लागली आहे. त्यांनी केलेली कामगिरी हि पोलीस दलाची प्रतीमा उंचावणारी असल्याने **मा.पोलीस आयुक्त श्री मधुकर पाण्डेय** यांनी **पोउपनि/जगदिश नाईक-(सेवानिवृत्त)** यांचा पोलीस आयुक्त कार्यालयामध्ये बोलावून विशेष सत्कार करुन प्रशंसा केली आहे.

------




महाराष्ट्र पोलीस